प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९-१९८२)

**ऋषींनी शिकवले तसे
आम्ही ध्यान शिकवतो.**

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य होते. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्त ऋषींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन

★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
★ शांतता ही आपली भाषा आहे
★ ध्यान हा आपला मार्ग आहे
★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

# प्रकाशमार्ग

Volume 6 Issue 2 NOVEMBER 2013 Rs. 25

## चिंतन

गुरुजी कृष्णानंद
(मागील अंकांमधून घेतलेले वेचे, अनुवाद : सुनिता देशपांडे)

माझ्या गावाजवळ एक लहानशी टेकडी आहे आणि त्यावर एकुलते एक झाड आहे. जेव्हा मी लहान होतो तेव्हा सूर्यास्त पाहायला माझ्या मित्रांसोबत तिथे जात असे. तिथे बरेचदा मी सूर्यास्ताचे चित्र काढण्याचा प्रयत्न केला. पण जवळपास प्रत्येक सेकंदाला बदलणाऱ्या रंगांचे वैभव मी कुंचल्यात पकडू न शकल्याने निराश होत असे. पण ती पिवळी-लाल तबकडी रंग उधळत क्षितिजाच्या खाली जाताना आणि निसर्गात एक शीतल शांतता पसरवताना शांतपणे पाहण्याचा आनंद मी नेहमीच लुटत असे. मी काहीतरी दिव्य व गूढरम्य अनुभवत असे जे मी समजू शकत नव्हतो आणि त्याची दूरान्वयाने का होईना पण कल्पना देऊ शकतील असे शब्द सुद्धा मला कधीच सापडले नाहीत. ही जवळपास पन्नास वर्षांपूर्वीची घटना आहे.

अलीकडेच मी पुन्हा एकदा त्याच जागी गेलो होतो. बदलत्या काळाचा स्पर्श त्या जागेला झाला नव्हता. संध्याकाळची वेळ होती आणि तेच मित्र जमले होते. जीवनाच्या निकडीमुळे ते देशाच्या विविध भागात विखुरले होते आणि परत एकदा जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी तिथे जमा झाले होते. आम्हा सर्वांना पुन्हा तिथे सूर्यास्ताचा अनुभव घ्यायचा होता. माझ्यासाठी, पन्नास वर्षांपूर्वीच्या माझ्या कुमारावस्थेत जाऊन, गूढ सूर्यास्ताचा अनुभव घेण्याचा, आपल्या अंतरंगात साठवण्याचा तो एक महान क्षण होता. मी माझा श्वास रोखून सूर्यास्ताची वाट पाहत होतो. अपेक्षा होती की इतरही शांतपणे ते अद्भुत दृश्य पाहण्यासाठी मला सामील होतील. पण माझे मित्र कोणत्यातरी मुद्द्यावर गंभीरपणे चर्चा करीत होते. मी त्यांच्या चर्चेत व्यत्यय आणायचे टाळले. तीच पिवळी-लाल तबकडी खाली सरकली आणि मनोहारी आणि जिवंत रंग उधळत दूरवर क्षितिजात लुप्त झाली. ती अलौकिक संध्या हळूहळू लुप्त झाली आणि चर्चेत रंगलेल्या माझ्या मित्रांचे तिकडे लक्षही गेले नाही. खेदपूर्णतेने माझ्या लक्षात आले की, आमच्यामधून काहीतरी हरवले होते, ते म्हणजे आमच्यातील बालक, आमची निरागसता.

आपल्या निरागसतेकडे परत जाणे हा आध्यात्मिक प्रवास आहे. स्पर्धा आणि यशाच्या मागे लागलेल्या थंड आणि क्रूर जगातील सर्व भ्रष्टाचार आणि प्रलोभनांना तात्पुरते का असेना, पण बाजूला सारून सृष्टीचे सौंदर्य आणि सत्य अनुभवण्यासाठी निरागसतेकडे आपल्याला परत जायला हवे. निरागसतेकडे परत जाण्याकरिता, समाधीचा अनुभव घेण्याकरिता आपण ध्यान करतो. येशु ख्रिस्तांनी सांगितले होते: "देवाच्या राज्यात प्रवेश करण्यासाठी तुम्हाला एक बालक बनावे लागेल." ते एक महात्मा होते आणि ते कशाबद्दल बोलत होते ह्याचे त्यांना पूर्णपणे भान होते.

काल मी, गंभीर रोगाने ग्रासलेल्या एका वयस्कर माणसाला भेटलो. त्याला माहीत होते की त्याचे दिवस भरले आहेत पण त्याला त्याची फिकीर नव्हती. तो मरणासाठी तयार होता आणि इथल्या कोणावर किंवा कोणत्याही गोष्टीवर त्याची आसक्ती नव्हती. मी किती हेलावून गेलो ते शब्दात सांगणे कठीण आहे. तो एक विरळा आणि सच्चा आध्यात्मिक मनुष्य होता. त्याच्याशी बोलणे आणि त्याला जाणणे हा एक माझ्यासाठी दुर्मिळ अनुभव होता आणि एक उत्साहवर्धक बदल होता, कारण जे लोक असोशीने माझ्याशी बोलण्याच्या प्रयत्नात असतात, ते सामान्यतः त्यांच्या भावनिक किंवा अहंकारनिर्मित समस्यांमुळे तणावग्रस्त असतात आणि स्वतःच्या वागण्यात आध्यात्मिक बदल न घडवता, लौकिक फायदे त्वरित मिळवण्यासाठी उतावीळ असतात. संपूर्ण दिवस, तो मनुष्य माझ्या मनात आणि माझ्या विचारांमध्ये घर करून होता. त्याच्यासारखे परिपूर्ण वैराग्याच्या अवस्थेत मी पण पोहोचावे असे खूप मला वाटते.

एप्रिल महिन्यात क्वचित पडणाऱ्या पावसाच्या सरी तपोनगरच्या निसर्गात थंडावा आणि चैतन्य घेऊन आल्या. दोन वर्षांपूर्वी आम्ही लावलेले एक छोटे झाड आज लाल फुलांच्या पहिल्या गुच्छासमेत हसते आहे. त्याच्याकडून मिळणारा आनंद आणि उत्साह शब्दांपलीकडचा आहे. कोणी हे पाहून असा अनुभव घेतला की नाही ते मला माहीत नाही. पण, सर्वांनी हे अनुभवावे असे मात्र मला वाटते.

**मानसा फाउंडेशन (रजि.)**
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर-बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, ९९०००७५२८० (सकाळी १० ते दु. ४ पर्यंत)
इ-मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम

### आनेकल येथे

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)
**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.

**Doorways (इंग्रजीत) / तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)**
**वार्षिक वर्गणी रू. ३००/–**
**ड्राफ्ट कृपया मानसा लाइट एज फाउंडेशन च्या नावाने काढावा.**
**कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.**

### वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.



**तपोनगर रहिवासी आयुध पूजे निमित्त आपल्या गाड्या दैवी प्रकाशाने भरून ऊर्जित करताना**

## काही ठळक घडामोडी

- २४–११–२०१३ रोजी तपोनगर येथे गुरुजींचा महासमाधी कार्यक्रम आयोजित करण्यात येईल. ह्या कार्यक्रमात भाग घेण्याची इच्छा असणाऱ्यांनी २१–११–२०१३ पर्यंत मानसा कार्यलयात आपले नाव नोंदवावे.
- "Experiences of Light Channels – Vol.2" हे पुस्तक आणि गुरुजींच्या सोबत ऑक्टोबर २०१२ महिन्यात झालेल्या अनौपचारिक बैठकीचे व्हीडियो रेकॉर्डिंग असलेली डी.व्ही.डी. यांचे २४–११–२०१३ रोजी गुरुजींच्या महासमाधी निमित्त होणाऱ्या कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रकाशन करण्यात येईल.
- रविवारच्या व्याख्यानांच्या डी.व्ही.डीज्. ऑक्टोबर २०१३ पासून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध केल्या जातील. ज्या विद्यार्थ्यांना ह्यासाठी वर्गणीकरण करायची इच्छा असेल त्यांनी अधिक माहितीसाठी कृपया मानसा कार्यलयाशी संपर्क साधावा ही विनंती.
- जानेवारी २०१४ पासून शंबला गटाची नवीन बॅच सुरू होत आहे. ह्यात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी कृपया ३०–१२–२०१३ पर्यंत मानसा कार्यालयात आपले नाव नोंदवावे. बाहेरील विद्यार्थी देखील ह्यात प्रवेश घेऊ शकतील. सध्या शंबला गटात असलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या सदस्यत्वाचे नूतनीकरण करण्यासाठी ३०–१२–२०१३ पर्यंत नाव नोंदवावे ही विनंती.
- २०१४ वर्षाचे डेस्क कॅलेंडर्स डिसेंबरच्या शेवटी उपलब्ध राहतील. कॅलेंडर्ससाठी कृपया १५–१२–२०१३ पर्यंत मानसा कार्यालयात नाव नोंदवावे ही विनंती.

## आनेकल येथील कार्यक्रम

२३–११–२०१३ रोजी आपल्या सप्तर्षी ध्यान केंद्रात सकाळी ११ वाजता गुरुजींच्या महासमाधी दिवसानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात येईल.

## ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०२ | शनिवार | नरक चतुर्दशी |
| ०३ | रविवार | महालक्ष्मी पूजन / दिवाळी / अमावास्या / सूर्य ग्रहण: दुपारी ३.३४ ते रात्री ८.५८ पर्यंत |
| १० | रविवार | शुक्लाष्टमी |
| १२ | मंगळवार | शुक्ल दशमी |
| १७ | रविवार | पौर्णिमा |
| १८ | सोमवार | विष्णू दीप |
| २३ | शनिवार | गुरुजींचा महासमाधी दिवस |
| २४ | रविवार | गुरुजींचा महसमाधी कार्यक्रम |
| २६ | मंगळवार | कृष्णाष्टमी |

## तपोनगरातील कार्यक्रम

| | |
|---|---|
| दर रविवारी | – व्याख्यान सकाळी ११ ते १२ पर्यंत |
| | – विशेष ध्यान आणि प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |
| रविवार १० | – शंबला गटाची बैठक दुपारी २ वाजता |
| रविवार १७ | – 'रा' गटाची बैठक दुपारी २ वाजता |
| रविवार २४ | – गुरुजींचा महासमाधी कार्यक्रम |

## गुरुजींचा महासमाधी कार्यक्रम
## रविवार, २४–११–२०१३

| | |
|---|---|
| सकाळी ११ वाजता | स्वागत |
| | वरिष्ठ साधकांचे व्याख्यान |
| | पुस्तकाचे आणि डी.व्ही.डी चे प्रकाशन |
| | विशेष ध्यान |
| दुपारी १२.३० वाजता | प्रसाद |

## गुरुजी, तुमच्यासाठी

पद्मजा बालाजी, अनुवाद : पूर्णिमा परुळेकर

लोकांनी खचाखच भरलेल्या ध्यानकक्षात मी होते कोपऱ्यात बसलेली.
तुमच्या नाजुक, सडसडीत देहयष्टीने कक्षात हळुवार पाऊल ठेवले मात्र,
तुमच्या शक्तीने व प्रेमाने मी भारावून गेले पार.
आणि ढाळू लागले मूक अश्रू ओक्साबोक्शी .....

सागराने आणि आकाशाने सांगितलं होतं एकदा छोटंस गुपित
म्हणे धरून ठेवावे तयास जयाचे त्यांच्याशी साधर्म्य खास.
कितीक वर्षे फडफडवले नाहीत माझ्या फुलपाखरी हृदयाने पंख,
जोवर माझ्या रोमारोमांत थिरकला नव्हता तुमच्या शब्दांचा पदन्यास.

सावल्या फिकट जाहल्या तुमचा प्रकाश पांघरल्या क्षणी.
आणि इंद्रधनुष्ये तळपू लागली माझ्या डाव्या उजव्या दिशी.
सुहास्य पाहण्या तुमचे पाय लागले पळू सुस्ती टाकूनी
तुमच्या क्षणभर सहवासाची आसही होती मनी.

शेकडोंच्या उपस्थितीमध्ये विसरली पापण्यांची उघडझाप
जेव्हा तुम्ही करवले मम अंतरीच्या शाश्वताचे दर्शन क्षणमात्र
अंतरातून मम जीवनाच्या मलिन पटाने उलगडल्या
भेटी सांकेतिक, अनंतयात्री जीवाच्या संघर्षाशी.

पाहिले मी देव आणि पाहिले देवदूत करताना चर्चा होऊन विस्मयचकित
की सागर व आकाश कोणाला नकळत मानिती आपुल्या प्रेमाला त्यांचे परिमाण
शंका फिटे निःसंशय का मी आसवांशी झुंजले
असे जरी माझे पात्र यश्किंचित्, लहान
परीसस्पर्श होता आपुला होई दैदीप्यमान !!!

## तपोनगर डायरी

सीमा अलमेल सोमायजी, अनुवाद : वैशाली जोशी

गुरुजी भौतिक जगाच्या पलीकडे जाऊन तपोनगरात विलीन झाले त्याला एक वर्ष झाले. ते आपल्यापैकी प्रत्येकाच्या सोबत आहेत ह्या वस्तुस्थितीची बहुतेक ध्यानसाधकांच्या वाणीतून पुनरुक्ति होते. गुरुजींची मूल्य प्रणाली आध्यात्मिक मंडळाच्या आणि विश्वस्तांच्या निर्णयांमध्ये आढळते. मानसा फाउंडेशनच्या कामकाजाविषयीचा त्यांचा काटेकोर दृष्टिकोन प्रशासकीय कार्यालयात आजही तसाच पाळला जातो. ध्यान शिकवणाऱ्या, दीक्षा देणाऱ्या आणि प्रत्येक महिन्यात आध्यात्मिक तपासणी घेणाऱ्या स्वयंसेवकांमध्ये त्यांची शिस्त स्पष्ट ओळखू येते.

गुरुजींनी सुरू केलेल्या प्रकाशाद्वारे क्रांतीची, त्यांना आवडली असती तशाच आखीव पद्धतीने प्रगती होते आहे, आणि त्यांचे स्वप्न असलेल्या प्रकाश युगाचा उदय मेहनती प्रकाश प्रवहन स्वयंसेवकांच्याद्वारे होत आहे. गुरुजींची अभ्यासकेंद्र परियोजनेबद्दलची आस्था त्याच्या सदस्यांच्या चिकाटीच्या प्रयत्नांमध्ये दिसून येते. स्थानिक गावकऱ्यांना त्यांनी दिलेला मदतीचा हात आजही मुलांसाठी असलेल्या ज्योती प्रोजेक्ट आणि कम्प्यूटर वर्गांतून दिला जात आहे.

गुरुजींनी स्थापन केलेल्या दुर्मिळ ऊर्जा ध्यानसाधकांना मदत करीत आहेत. मेडिटेशन हॉल्समध्ये सदैव उपयुक्त ज्ञान भविष्यकाळासाठी सामावलेले आहे. रहिवाशांची प्रत्येक बैठक हा एक आनंदोत्सव असतो ज्यात गुरुजींचा आनंद अनुभवता येतो. त्यांचे एक आध्यात्मिक सहजीवन स्थापन करण्याचे यश सतत वाढणाऱ्या रहिवासी आणि अनिवासी तपोनगरवासीयांच्या संख्येमध्ये दिसून येते.

गुरुजींसारखे आध्यात्मिक गुरू येणाऱ्या अनेक पिढ्यांच्या कल्याणासाठी अवतरतात. मानसा फाउंडेशनची पहिली पंचवीस वर्षे दाखवतात की गुरुजींचे कार्य नुकतेच सुरू झाले आहे. गुरुजींवर कायम प्रेम करणाऱ्या सर्वांद्वारे त्यांचे स्वप्न साकार होईल. ■

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंतःकरणाची चळवळ आहे. ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी ही चळवळ आहे. एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत की घोषणा फलक नाहीत. एक अशी चळवळ जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढेच पुरेसे आहे. प्रकाशाला प्रवाहित करा. मग शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाशच करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांत असलेल्या अंधःकाराला दूर करतो. त्यामुळे माणसांत परिवर्तन घडते. माणसांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते आणि ते प्रकाशमय बनते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून शक्तीच्या गाभ्यापासून येणारा अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूलस्त्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, विवेक आणि उज्वल भविष्य. आणि तो अदृश्यपणे सर्वत्र वास करून आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगाचे परिवर्तन करूया.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८-०५-२००८ रोजी तारामंडळीय परिषदेने म्हणजेच सप्तर्षींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवा.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही प्राचीन ऋषींनी दिलेली सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबला या पृथ्वीवरील प्रकाशाच्या नगरीत राहाणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.
२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि प्रेम सर्वत्र पसरवा.
३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.
४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.
५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.
६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.
७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वतःहून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवा.

## गुरुजी उवाच

(संकलन : शोभा राव ; अनुवाद : पूर्णिमा परुळेकर)

फेब्रुवारी, २००४

तपोनगर हे स्वप्न आहे. देवाने संपूर्ण सृष्टीचे स्वप्न पाहिले आणि ऋषींनी तपोनगराचे. ऋषींनी वैश्विक मनोऱ्याचे (कॉस्मिक टॉवरचे), तपोवनाचे स्वप्न पाहिले. आपण या सुंदर स्वप्नाचे घटक आहोत. आपण हे जाणून याविषयी अभिमान बाळगला पाहिजे.

आपल्याला माहीत आहे की या भूलोकात दोन परस्परविरोधी शक्ती आहेत. त्या म्हणजे सुष्ट व दुष्ट. या शक्ती माणसांमध्ये प्रवेश करून त्यांना विरुद्ध दिशांमध्ये ढकलून कार्य करतात. ज्यांच्या भावना व विचार सकारात्मक असतात त्यांच्याकडे सुष्ट शक्ती आकर्षित होतात. ही माणसे ऋषींच्या स्वप्नाला प्रतिष्ठा मिळवून देतात. जी माणसे नकारात्मक भावनांना स्वतःवर सत्ता गाजवू देतात ती साहजिकच दुष्ट शक्तींना निमंत्रण देतात, ज्या सदैव विश्वातील सर्जनशील शक्तींच्या विरोधात काम करतात. आपण सावध राहून सकारात्मक शक्तींना आकर्षित केले पाहिजे. ते केवळ यासाठी की त्या आपल्याला सदैव देवाच्या निकट सान्निध्यात ठेवतात व आपण सदैव परमानंदाच्या अनुभूतीमध्ये राहतो. आपण सर्व अडचणींवर मात करू शकतो आणि मृत्युपश्चात आपण देवाकडे परत जातो.

दुष्ट शक्ती आपल्या आयुष्यात दुःख, अडचणी आणतात, आपल्याला सैरभैर करतात आणि त्यामुळे आपण ह्या सृष्टीचा मुळीच आनंद घेऊ शकत नाही. देवापाशी परत जाण्यासाठी आपल्याला बराच काळ वाट पाहावी लागते. आपण नेहमी सकारात्मक विचार केला पाहिजे व सकारात्मक भावना व्यक्त केल्या पाहिजेत. आपण अहंकार सोडला पाहिजे. दुष्ट शक्ती सर्व आध्यात्मिक कामात अडथळे आणतात. तुम्ही लक्षात घ्या की कोणतेही चांगले कार्य सोपे नसते. आपली साधना सोपी नसते. साधनेच्या मार्गात अडथळे, मार्गापासून दूर नेणारी प्रलोभने व इतर निराशा उत्पन्न करणारे घटक नेहमी हजर असतात. ऋषींबरोबरचा व आध्यात्मिक जीवनातील इतक्या वर्षांचा माझा अनुभव सांगतो की जर आपली ऋषींवर श्रद्धा असेल, जर आपण त्यांना शरण गेलो तर ते आपल्या आयुष्यातील प्रत्येक गोष्टीची काळजी घेतात.

हा वैश्विक मनोरा ही अतिशय महत्त्वाची वास्तू आहे. तिच्यात या विश्वाच्या सर्व सकारात्मक व दैवी ऊर्जा सामावलेल्या आहेत. इथे इतर लोकांत किंवा इतर आयामात जाण्यासाठी प्रवेशद्वारे आहेत. सप्तलोकांतील ऊर्जा साठवण्यासाठी आपले ऋषी लौकरच सूक्ष्म पातळीवर सात खोल्या बांधणार आहेत. आणखी चार खोल्या चार दैवी लोकांतील ऊर्जांसाठी बांधणार आहेत. तसेच, सूक्ष्म पातळीवर ते बोगदे बांधणार आहेत. हा मनोरा अशी अप्रतिम रचना, अशी अद्वितीय जागा बनेल जिथे आपण ध्यान करून आपल्याला हव्या असलेल्या कोणत्याही आयामात प्रवेश करू शकू व जाणिवेच्या अत्युच्च स्तरावर पोहोचू शकू. ऋषींनी आज सकाळी या मनोऱ्याला ऊर्जित केले. हे एक छोटेखानी भौतिक ब्रह्मांडच आहे, म्हणाना! फक्त ब्रह्मांडाचा खालचा भाग इथे नाही. बाकी सर्व आहे.

ऋषींनी तपोवनातील सप्तर्षींचे पुतळे सुद्धा ऊर्जित केले. सर्व ऋषींनी स्वतःचा अंश किंवा ऊर्जा एकेका विशिष्ट पुतळ्यात ठेवली आहे. आपण ऊर्जा अर्पण करून या पुतळ्यांची सातत्याने पूजा केली म्हणजे त्या त्या पुतळ्याच्या आत वसणारे ऊर्जाक्षेत्र सामर्थ्यशाली बनेल. आपण त्या ठिकाणी जाऊन, बसून ऋषींशी बोलू शकू. त्या ठिकाणी ऋषींबरोबर संपर्क साधणे फार सोपे जाईल.

सात चक्रांचे प्रतिनिधित्व करणारे तपोवनातील मंडपसुद्धा ऋषींनी जागृत केले व त्यांच्या तळाशी ऊर्जांची स्थापना केली. चक्रसाधनेच्या निरनिराळ्या पातळ्यांवर असलेले लोक त्या चक्राशी संबंधित मंडपात बसून ध्यान करू शकतात. त्यांना त्या विशिष्ट चक्राचे फायदे व संबंधित ऊर्जा मिळतील आणि त्यांची प्रगती झपाट्याने होईल. वरच्या पायऱ्यांवरील साधक कोणत्याही मंडपात बसू शकतात आणि स्वतःच्या पायरीच्या खाली न येतासुद्धा या सर्व चक्रांचे अनुभव घेऊ शकतात.

ह्या सर्व कार्याच्या पाठीशी माझ्या गुरुंचे, अमरांचे प्रेम व कृपा आहे. ऋषींचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी त्यांनीच प्रेरणा दिली, मार्गदर्शन केले आणि सर्वतोपरी साह्य केले. ह्या कार्याच्या रूपाने त्यांनी आपल्याला भेटवस्तू दिल्या आहेत. आपले प्रेम, निष्ठा व प्रगतीचा दृढनिश्चय हीच अमरांना आपल्याकडून देण्यासारखी यथार्थ भेटवस्तू असेल.

अमर काळाच्या फार पुढे होते. त्यामुळे लोक त्यांना समजू शकले नाहीत. ते जीवित असताना लोकांनी त्यांची कदर केली नाही. रुढी, परंपरांच्या पलीकडे गोष्टी आहेत हे अमरांनी आपल्याला शिकवले. त्यांनी आपल्याला शिकवले की निरांजन न पेटवता, फुले न वाहतासुद्धा आपण देवाची पूजा करू शकतो. आपल्यामध्ये असलेली सर्वोत्तम गोष्ट आहे प्रेम. सृष्टीतील सर्वोत्तम गोष्ट आहे देवापासून मिळणाऱ्या ऊर्जा. देवाला आपले प्रेम व ऊर्जा वाहून केलेली पूजा हीच अत्यंत सुयोग्य व सर्वोत्तम असते. अमरांनी आपल्याला सांगितले की भगवान व्यंकटेश्वराची पूजा करण्याकरिता आपल्याला तिरुपतीला जाणे आवश्यक नाही. त्यांनी आपल्याला शुद्ध, निखळ ज्ञान दिले. त्यांनी आपली सूक्ष्म जगाशी व ऋषींशी ओळख करून दिली. त्यांनी आपल्याला विवेकाचा व ज्ञानाचा प्रकाश दिला. परंतु, आपल्यापैकी काहीजण हा प्रकाश पाहू शकत नसतील ते केवळ यामुळे, की आपण डोळे मिटून घेतले आहेत. प्रकाश सदैव इथे असतो. बऱ्याच जणांनी डोळे उघडले आहेत व इतरही कालांतराने निश्चित डोळे उघडतील. असाही आपण खूप कालापव्यय केला आहे. आपण यापेक्षाही पुष्कळ प्रकाश आपल्या जीवनात आणू शकत होतो.

जर आपण अजून सुरवात केली नसेल तर आज आपण साधना सुरू करण्याचा निश्चय करूया. किंवा सुरू असलेली साधना आणखी दृढ करूया. आपण प्रेम प्रकट करायला सुरवात करूया कारण, प्रेम आपल्याला देवाजवळ घेऊन जाते, प्रेम आपल्याला जे जे आध्यात्मिक आहे ते सर्व देते, असे प्रेम आपल्याला ऋषीपदावर पोचवते. ध्यानाची मदत निश्चित होते पण आपण प्रेमही प्रकट करायला हवे.

मला वाटते की तुम्हाला माहीत व्हावे की मी ऋषींचा शिष्य आहे पण इतरांसाठी मी गुरु आहे. लोक माझ्यात एक मित्र किंवा नातेवाईक पाहतात यात काहीच गैर नाही. पण माझ्यातले गुरुतत्त्व त्यांच्या नजरेतून निसटते. लक्षात न येणे किंवा येऊनही दुर्लक्ष करणे ही मनुष्याची स्वाभाविक प्रवृत्ती आहे, जसे अमरांच्या बाबतीत झाले. मी अमरांविषयी अनेक अनुदार टिप्पण्णया ऐकल्या आहेत. परंतु, अमर एक परिपूर्ण योगी होते. योगी पुरुषांची चरित्रे वाचताना देखील मला अमरांसारखे दुसरे कोणीच आढळले नाही. माझ्या गुरुंवर भाष्य करण्याची माझी जराही योग्यता नाही. पण, हेही खरे आहे की प्रत्येक गुरुचे स्वतःचे असे वैशिष्ट्य असते. अमर

# गुरुजी उवाच

(संकलन : शोभा राव ; अनुवाद : पूर्णिमा परुळेकर)

देवांशी संवाद करू शकत होते, इतर लोकांत फिरू शकत होते, पण तरीही समाजात ते सर्वसामान्य माणसासारखे वावरायचे. मला खूप वाटते की तुम्ही त्यांना भेटायला हवे होते. तुम्हाला त्यांच्याकडून खूप काही मिळाले असते.

तपोनगर जागृत होते आहे. याची दखल घेऊन आपण आनंद मानूया. मला विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांची गुणवत्ता मला खोलवर स्पर्शून जाते. आपल्याकडचे विद्यार्थी, शिक्षक आणि आपली केंद्रे वाढली आहेत. मला संख्येविषयी बोलायचे नाही तर गुणवत्तेविषयी बोलायचे आहे. खूप लोकांना छान छान अनुभव येत आहेत. त्यातील काहीजण सांगतात आणि काहीजण बुजऱ्या स्वभावापोटी गप्प राहतात. या सर्वावरून असे दिसते की अमरांनी आरंभ केलेले प्रकाशाचे केंद्र वाढते आहे. पण कधीकधी मी तितकासा खुश नसतो. तुमची प्रगती होते आहे हे खरे, परंतु आध्यात्मिक जीवनात तेवढे पुरेसे नाही. परिपूर्णता सुद्धा पुरेशी नाही. त्यामुळे माझ्या तुमच्याकडून खूप अपेक्षा आहेत. माझ्या बोलण्याचे स्मरण ठेवा, तुम्ही विचार करताना, भावना व्यक्त करताना, कृती करताना आणि जगण्याच्या प्रत्येक क्षणी तुम्हाला ऋषींप्रमाणेच वागले पाहिजे. शिस्तीकडे तुम्ही लक्ष दिले पाहिजे आणि शिस्त पाळली पाहिजे.

आपण आपला अहंकार सोडत नाही, आपापल्या मतांना चिकटून राहतो. यामुळे एक प्रकारचा संघर्ष उत्पन्न होतो. जर आपण ऋषींच्या पद्धतीने गोष्टी करायला प्रारंभ केला तर आपल्या जीवनात नेहमी सुसंवाद नांदेल. माझे सांगणे लोकांना समजते. पण कधीकधी ते अडखळतात. त्यांना मदत करायला आम्ही सदैव तत्पर असतो. जेव्हा कधीही तुम्हाला भावनिक आणि आध्यात्मिक समस्या असेल तेव्हा आमच्यापाशी या. आम्ही त्यातून मार्ग काढू. तुमच्यामध्ये विनम्रता येऊ द्या. ऋषींना शरण जा. त्यांच्या छत्राखाली आपण सुरक्षित व संरक्षित असतो. फक्त जेव्हा आपण आपल्या अहंकाराला मुक्त वाव देतो तेव्हा तो निश्चितपणे आपल्याला चुकीच्या मार्गावर नेतो. तो आपल्याला देवापासून दूर नेतो, ह्या मार्गापासून दूर नेतो. आपल्या आयुष्याचे नेतृत्व देवाला करू द्यावे; आपल्या आयुष्याचे निर्णय ऋषींना घेऊ द्यावेत.

ध्यान करताना आपण देवाला प्रकाशरूपात अनुभवतो. साधनेत कोणत्या ना कोणत्या टप्प्यावर, कोणत्या ना कोणत्या वेळी आपल्याला प्रकाश भेटतो. आपण प्रकाश नुसताच पाहत नाही तर प्रकाशाचा म्हणजेच देवाचा अनुभव घेतो आणि स्वतः प्रकाशरूप होतो. जेव्हा कोणतीही क्षुब्धता नसते, आकस नसतो, तक्रार नसते, कुरकुर नसते तेव्हा आपण देवाला शांतीरूपात अनुभवू शकतो. आकाशाचा विचार केला तर आपण त्याचे अमर्याद रूप अनुभवू शकतो. इतर स्तरांवरसुद्धा आपल्या भावना व विचार व्यापक बनवून आपण हे अनुभवू शकतो. जेथे जेथे विस्तीर्णता, व्यापकता आहे तेथे देव असतो आणि आपण त्याला एक प्रकारच्या तरल, उत्थानावस्थेत अनुभवतो. जाणिवेच्या त्या उत्थानावस्थेत आपण देवाला तृप्ती किंवा परिपूर्ती म्हणून अनुभवू शकतो. आपण देवाकडे पोचल्यावरच एक प्रकारे समाधान लाभते. आपण त्याला स्पर्श केल्यानंतरच आपली वाटचाल संपते, संघर्ष संपतात. आपण शुद्ध असलो तरच आपल्याला देवाचा अनुभव येईल. आपण देवाचा अनुभव अनेक पद्धतींनी घेऊ शकतो. आपण देवाचा अनुभव सभोवतीच्या निसर्गात, सर्व तऱ्हेच्या जीवनात, आपल्या भोवताली होत असलेल्या जीवनाच्या प्रत्येक हालचालीत घेऊ शकतो. खेदाची गोष्ट ही आहे की आपण ह्या सर्व गोष्टींबाबत चुकतो आणि समजून चालतो की देव फक्त मूर्तीत असतो. त्या पायरीशीच आपण अडकून पडतो. आपण कमीतकमी बोलले पाहिजे. शांततेमध्ये आपल्याला आपल्या अंतरात देवाचा अनुभव येतो. आपण हे समजून घेतले पाहिजे की आपल्याला आपली जाणीव विस्तारली पाहिजे आणि हेही की जाणिवेच्या अशा विस्तारित अवस्थेततच आपण देवाला अनुभवतो.

नुकतीच मला एक तरुण मुलगी भेटली. तिने सांगितले की जवळजवळ दोन वर्षांपूर्वी तिने स्वप्नात इथे आत्ता विकसित होत असलेली बाग पाहिली होती. केवढे आश्चर्य!! यावरून हे सूचित होते की इथे बाग होणार ही गोष्ट नियत होती. सहसा आपण विचार करतो की आम्ही हे केले आणि आम्ही ते केले. पण आपल्याला कळते की आपण केवळ निमित्तमात्र असतो, त्याहून जास्त नाही. आपण कृतज्ञता मानली पाहिजे की ऋषींनी आपल्याला इथे असण्याची व त्यांच्या कार्यात सहभागी होण्याची संधी दिली आहे.

आपल्याला माहीत आहे की वडाच्या झाडासारखा प्रचंड वृक्ष अगदी लहानशा बीमधून जन्माला येतो. बीमध्ये वृक्षाचे जीवन असते व त्याच्या विकासाचा पक्का नकाशा असतो. त्याच प्रकारे व्यक्तीच्या आत दिव्य शक्तीचा वृक्ष सामावलेला असतो. बीजातून केवळ झाडच निर्माण होते. परंतु, व्यक्तीच्या आतून एक तर चांगले किंवा वाईट यापैकी काहीही बाहेर निघू शकते. ही शोकांतिका आहे, हे आव्हान आहे आणि ही आपल्या आयुष्याची सुंदरता सुद्धा आहे. हे आपल्या व्यक्तिगत संस्कारांमुळे, कर्मांमुळे घडते. हे आपल्या व्यक्तिगत आध्यात्मिक साधनेतील प्रगतीमुळे, आपल्या संबंधांमुळे व अर्थातच आपल्या प्रयत्नांमुळे घडते. जेव्हा आपण आपल्यामध्ये वसणारे दैवी तत्त्व बाहेर आणतो आणि चिकाटीने साधना करतो तेव्हा आपल्याला आध्यात्मिक अर्थाने मुक्ती मिळते. पण जेव्हा आपण क्रोध, मत्सर, कोतेपणा आणि असत्य आचरण यासारख्या नकारात्मक गोष्टी बाहेर आणतो तेव्हा स्वाभाविकपणेच आपली आध्यात्मिक अधोगती होते. मग, आपण इथे जन्म घेतला काय किंवा आणखी कुठे घेतला काय, आपल्याला बराच काळ आध्यात्मिक अंधारात चाचपडावे लागते.

आपण हे समजून घेतले पाहिजे व लक्षात ठेवले पाहिजे की दैवी संरचना आपल्या सर्व भावना, विचार व कृती पाहात असतात, त्यावर देखरेख करीत असतात, त्यांचे मूल्यमापनही करीत असतात आणि वर्गीकरण करीत असतात. आपल्या मृत्युपश्चात, पुढील जन्म घेण्याआधी जेव्हा आपण एका जागी किंवा एका पृथ्वीवर जातो, तेव्हा त्याचा लेखाजोखा आपल्याला दाखवण्यात येतो किंवा त्याविषयी सांगण्यात येते. ह्या गोष्टींमुळे आपण घाबरून जाण्याचे कारण नाही. आपण स्वतःच्या भावना, विचार व कृतींविषयी फार सावध असले पाहिजे. काही करण्यापूर्वी जर आपण थोडी सावधगिरी बाळगली, आपल्या अंतःप्रेरणेचा सल्ला घेतला तर आपण योग्य निवड करू. शंबला तत्त्वांचा अभ्यास करा. ध्यान साधनेत मदत करते, पुढे नेते हे खरं, पण शंबला तत्त्वांचा अभ्यास नकारात्मकता समूळ निपटून काढतो. ■

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क २००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ-मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- सगळ्या शंका व प्रश्नांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

**चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा.**

## गुरुजींकडून विशेष सूचना

- विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## माझ्या इच्छांची यादी – संपूर्ण

अपूर्वा देशपांडे, अनुवाद : सुनिता देशपांडे

जेव्हा माझे लेक्चरर तास संपल्यानंतरही वर्गात शिकवत राहतात तेव्हा मी अस्वस्थ होते आणि चुळबुळ करायला लागते. आठवड्याची सुरुवात झाल्या झाल्या मी साप्ताहिक सुट्टीची वाट पाहायला लागते. मी सुटव्यांच्या आशेवर जगत असते.

एकही सुट्टी नसलेले काम करणे किती सोपे आहे असे तुम्हाला वाटते? परीक्षेसाठी असणारा अभ्यासक्रम माहीत नसताना परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांसारख्या प्रश्नांना प्रत्येक शनिवारी आणि प्रत्येक 'रहिवाशांच्या भेटीत' सामोरे जाणे हे तुमच्या मते किती सोपे असेल? मागील पंचवीस वर्षे प्रत्येक रविवारच्या वर्गासाठी तयारी करणे आणि सतत नवीन माहिती देऊन लोकांना जागृत करणे, हे कितपत सोपे असेल? जेव्हा लोकांचे सतत तुमच्या प्रत्येक हालचालीकडे लक्ष असते तेव्हा सहजतेने वावरणे हे किती सोपे असेल? कोणी जर मला एका शब्दात गुरुजींची व्याख्या करण्यास सांगितली, तर मी म्हणेन 'स्वार्थरहित'.

मानसा फाऊंडेशनची स्थापना झाल्यापासून आपल्या गुरुजींनी तुमच्या आणि माझ्यासारख्या लोकांना प्रचंड प्रमाणात मदत करण्याचे अतूट कार्य केले आहे. त्यांनी ही सुंदर संस्था अक्षरशः आपल्या घामाने आणि रक्ताने एक एक वीट करत बांधली आहे. जीवनातील प्रत्येक वादळातून त्यांनी आपल्याला अलगद बाहेर काढले आहे. शतकांचे तप, यज्ञ किंवा पूजा करणे म्हणजेच आध्यात्मिक असणे असे कधीकधी समजले जाते आणि त्या गोष्टी सर्वसामान्य माणसांच्या आवाक्याबाहेरच्या आहेत, परंतु गुरुजींची आध्यात्मिकतेची संकल्पना खूपच साधी आहे – चांगले असणे. मी यापूर्वी कधीच यापेक्षा सोपी, परिपूर्ण आणि तर्कशुद्ध व्याख्या ऐकली किंवा वाचली नाही.

मृत्युपूर्वी काय काय करायचे आहे याची यादी माझ्याकडे नेहमीच असायची. पण प्रत्यक्ष परमेश्वरालाच मला भौतिक रूपात भेटता येईल ह्याचा मी माझ्या कोणत्याच दिवास्वप्नांमध्येही विचार केला नव्हता. आपण सर्व खूप भाग्यशाली आहोत कारण मानवरूपात जगणाऱ्या परमेश्वराचा आपल्याला सहवास लाभला, असे मला वाटते. गुरुजींच्या कृपेने, जीवनाचे तडाखे हळुवार बसतात. त्यांनी आपल्याला जीवन जगण्याचे प्रयोजन दिले आहे, आपल्या जीवनाला अर्थ दिला आहे, उद्देश दिला आहे. जीवन आता नैराश्यमय वाटत नाही. जीवनात आशा आहे, सूर्योदय आहे. ■

## प्रकाशाचे दीपस्तंभ

अभिनंदन कुंजली वासन, अनुवाद : सुनिता देशपांडे

मी हे लिहिण्यास सुरुवात केली आणि गुरुजींचे उत्तम वर्णन कसे करता येईल ह्या विचारात पडलो – एक पिता, माता, मामा, मित्र, मार्गदर्शक, सल्लागार, गुरू, का एक आदर्श व्यक्ती? मला वाटते की ते हे सर्व आणि याहूनही पुष्कळ काही होते. स्थळ आणि काळाच्या संगमावर एकच गुरुजी कितीतरी विविध लोकांच्या रूपात उपस्थित होते. प्रापंचिक आणि आध्यात्मिक जीवन यांमध्ये समतोल साधून, एक शिक्षक आणि विद्यार्थी म्हणून, एक पालक आणि मित्र म्हणून जगणारे ते एक आदर्श व्यक्तिमत्त्व होते.

गुरुजींसोबत राहण्याचे सौभाग्य लाभलेल्या इतक्या वर्षांमध्ये आम्हाला एकदा सुद्धा आमच्या वयांमधील तफावत जाणवली नाही. आमच्यातील वयाचा फरक हा काही मिनिटांचाच आहे असेच नेहमी वाटायचे. आमचे प्रश्न, मग ते भौतिक जगताविषयी असोत किंवा अलौकिक जगासंबंधी असोत, त्यांच्याकडे नेहमी उत्तर असायचेच.

आपल्यापैकी बहुतेक जणांनी "वाळूवर पावलांचे ठसे" हे वाचले असेलच, ज्यात देव म्हणतो की, त्या माणसाच्या कठीण काळात तो त्याला खांद्यावर घेऊन चालला होता. आपल्या कसोटीच्या काळात गुरुजींनी आपल्यालाही असेच खांद्यावर उचलून नेले आहे, हे आपण इथे आपल्या जीवनातही अनुभवले आहे. आपल्या नैराश्याच्या काळात ते आशेचा आणि प्रकाशाचा दीपस्तंभ बनून, आपल्या आयुष्याच्या अंधाऱ्या, वादळी समुद्रातून आपले मार्गदर्शन करत गेले. जेव्हा आपल्याला कोणताच मार्ग दिसत नसे तेव्हा ते आपल्याला मार्ग दाखवत असत. जेवढा विश्वास आपला स्वतःवर नसेल त्यापेक्षा जास्त विश्वास त्यांचा आपल्यावर होता.

प्रत्येकवेळी जेव्हा मी त्यांच्याबद्दल विचार करतो, तेव्हा माझ्या हृदयात एक वेदना उमटते. आमचे सर्व संवाद मला आठवतात. त्यांच्यासोबत वार्तालापाची मला खूप आठवण येते. मग मला आठवते की, दूरवर समुद्रात बोटी नाहीत म्हणून अंधारात मार्गदर्शन करण्याचे काम जसे दीपस्तंभ थांबवत नाही त्याप्रमाणेच गुरुजी सुद्धा आपल्याला मार्गदर्शन करण्यासाठी अजूनही उपस्थित आहेत. त्यांच्या अपेक्षांची उंची गाठायची, एवढेच आपल्याला करायचे आहे. ते अजूनही आपल्या प्रश्नांची उत्तरे देत आहेत. नीट ऐकण्यासाठी आपल्याला फक्त स्वतःला बदलावे लागेल. आपल्याकडून ज्या अपेक्षा गुरुजींना होत्या त्या पूर्ण करणे आणि नंतर त्यांच्याही पुढे जाणे हीच सर्वोत्तम गुरुदक्षिणा आपण त्यांना देऊ शकतो. ■

## गुरुजी

वैशाली जोशी

गुरुजींच्या ध्यान शिकण्याच्या इच्छेने त्यांना महर्षी अमरांकडे नेले. महर्षी अमरांसोबत ऋषींच्या मार्गावर प्रवास करताना ऋषींचे केंद्र स्थापन करण्यासाठी त्यांनी दिलेल्या हाकेस प्रतिसाद देऊन गुरुजी त्यांच्या कार्यात सहभागी झाले. त्यांना जी अकथित दु:खे, कष्ट आणि मानहानी भोगावी लागली त्यास त्यांनी त्यांच्या ध्येयापासून परावृत्त करू दिले नाही. त्यांनी निवडलेल्या वाटेवरून परतीचा मार्ग नाहीसा करून अत्यंत यातना भोगताना ते डळमळले नाहीत. ह्या सर्वातून सूर्याप्रमाणे उदित होऊन ते तळपले आणि त्यांनी ह्या पृथ्वीवर प्रकाश पसरविला.

त्यांनी आरंभापासून सुरुवात करून हे कार्य पद्धतशीरपणे आणि जागरुकतेने पुढे नेले. त्यांच्या प्रयत्नांच्या फलस्वरूप शक्तीशाली ऊर्जा असलेल्या मानसा आणि अंतर–मानसातील निरनिराळ्या इमारती आज ऐटीने उभ्या आहेत.

गुरुजींचे पृथ्वीवरील लोकांच्या वतीने नवीन ऊर्जांचा स्वीकार करून संपूर्ण पृथ्वीवर पसरविण्यासाठी त्यांची स्थापना करणे अगदी भगवान शंकरांनी गंगा नदीला धारण करून पृथ्वीला पवित्र करण्यासाठी तिला वाहू दिल्याप्रमाणे होते. त्यांचे नवीन ऊर्जांसोबत येणारे अपायकारक परिणाम शोषून घेणे संपूर्ण मानवजातीवर विपरीत परिणाम होऊ नयेत म्हणून भगवान शंकरांनी समुद्र मंथनातून बाहेर पडलेले विष प्राशन करण्यासमान होते.

आपण सर्व आपल्या अहंकारात बुडलेले होतो आणि त्यामुळे ते एकाकी होते, आणि आपली नकारात्मकता शोषून घेऊन त्याचे परिणाम भोगावे लागल्यामुळे त्यांना क्लेश व्हायचा, ही वस्तुस्थिति त्यांना उदास करायची. तरीही त्यांनी आपला न्यायनिवाडा न करता आपल्यावर बिनशर्त दैवी प्रेमाचा वर्षाव करणे चालू ठेवले. आपल्याला आपल्या मानवी मर्यादांना उल्लंघून आपल्या उगमाकडे जाता यावे म्हणून ते नेहमीच प्रत्येक तऱ्हेने आपली मदत करायला तयार असायचे. ते स्व:त प्रकाशाचे प्रवेशद्वार होते आणि अजूनही आहेत. ■

## गुरुजी, जीवनाचे पुस्तक

जया बी. ; अनुवाद – वैशाली जोशी

गुरुजी देहाने आपल्यात नाहीत या वेदनेचा सल कमी करण्यासाठी जणू मागचे वर्ष कसे भुर्रकन उडून गेले.

गुरुजींचे आयुष्य संतुलित जीवन जगण्यासाठी एक परिपूर्ण वस्तुपाठ आहे आणि मिळालेल्या प्रत्येक संधीला त्यांनी पुन्हा पुन्हा ह्यावरच जोर दिला. त्यांच्या मते यथार्थ जीवन जगणे म्हणजे आयुष्याच्या ऐहिक आणि पारमार्थिक ह्या दोन्ही बाजूंमध्ये संतुलन साधणे. देवाच्या शोधात कोणी हिमालयात पलायन करण्याची गरज नाही कारण, हे सुद्धा स्वप्नरंजन नसून या मार्गातही लपलेले खड्डे असतात. आपण कोणत्याही मार्गाने आपला आध्यात्मिक शोध सुरू केला तरी अडथळे आणि कसोटी हे या प्रवासात ठेवलेलेच आहेत.

गुरुजींनी वारंवार एक आध्यात्मिक गुरू म्हणूनच जन्म घेतला तरीही या ऐहिक जीवनातील उतारचढावांपासून त्यांना सूट नव्हती. पण त्यांची त्यांचे गुरू, महर्षी अमर यांच्यावर आणि ऋषींवर संपूर्ण निष्ठा आणि समर्पणभाव असल्यामुळे ते हलाखीच्या परिस्थितीतही राजासारखे जगले. नागवणूक, मानहानी आणि विश्वासघाताच्या वेदना आणि लोकांकडून अस्वीकार आणि होणारे खोटेनाटे आरोप देखील त्यांनी धैर्याने आणि हसतमुखाने सहन केले.

ह्या प्रलयाच्या काळात नवयुगाचे गुरू म्हणून मानवजातीला मार्गदर्शन करण्यासाठी ऋषींनी त्यांची निवड केली पण त्यांचे कार्य सोपे नव्हते. पाच हजार वर्षांच्या अंध:काराच्या तावडीतून मानवजातीस खेचून वर काढणे हे एक महत्प्रयासाचे कार्य होते. पण दैवी योजनेवरच्या त्यांच्या निष्ठेमुळे अशक्यप्राय गोष्ट साध्य करण्यास त्यांना मदत झाली. ज्या वेगाने या केंद्रातील शांतता व स्तब्धता वाढली आहे ते खरोखर वाखाणण्यायोग्य आहे.

ते ह्या काळातील सर्वात महान गुरू होते तरीही आपल्यामध्ये वावरताना ते विनयशीलतेने, साधेपणाने आणि मनुष्य आणि निसर्गाशी एकत्वाने राहिले.

जो कोणी त्यांच्याशी आणि ह्या जागेशी पूर्ण संवादी होण्याचा प्रयत्न करेल तो आता देखील त्यांची अखंडित उपस्थिती आणि मार्गदर्शन अनुभवण्यात अयशस्वी होणार नाही. ■


## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| Light Body & Other Realities | 75/- |
| Master-Pupil Talks | 60/- |
| iGuruji Vol 1,3,4 & 7 | each 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 5 | 100/- |
| iGuruji - Vol 6 | 75/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis | 250/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol 2 | 150/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol 3 & 4 | each 200/- |
| Guruji Speaks Part - I & II | each 200/- |
| Guruji Speaks (Vol - 3) | 150/- |
| Guruji Speaks (Vol 4, 5, 6 & 7) | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 & 2 | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 3 | 150/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences | 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| Quotes from the Rishis | 100/- |
| Pyramid Revelations | 75/- |
| ऋषींकडून मिळालेले ज्ञान (Marathi) | 200/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| आय्‌गुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| गुरु–शिष्य संवाद (Marathi) | 60/- |
| ध्यान कैसे करें (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |

### ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)

मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१–२८६–१८९०/२४४–९५८५)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)

द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)


द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)

उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)

यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

RNI. No. KARMAR/2008/27314 Registered Postal Regn. No. L/CNA/68/2012-14
Date of posting Newsletter-25th of Every Month. Posted at Bangalore GPO No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९ – २०१२)

### मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन या ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

इथे "मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०–जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

## आपल्या 'वर्डप्रेस' वरील 'रिव्हॉल्यूशन बाय लाइट' या ब्लॉगवर वाचकांची प्रतिक्रिया

(संकलन व अनुवाद – गुरुराज कानाडे)

सृष्टीकर्त्याचा अनंत प्रकाश सर्वात, सर्व विश्वांच्या प्रत्येक चैतन्यात, दृश्य व अदृश्य आणि ज्ञात व अज्ञात अशा सर्व आयामांमध्ये, सर्व जगांमध्ये सर्वत्र व्यापलेला आहे. सृष्टीकर्ताच या प्रकाशाचा स्रोत आहे. जेव्हा आपण दया आणि कनवाळूपणा दाखवतो तेव्हा आपण सृष्टीकर्त्याच्या या प्रकाशाचे प्रवहन करत असतो. जेव्हा आपण शांतीसाठी कार्य करतो तेव्हा आपण मानवतेसाठी कार्य करीत असतो.

– जोनाथन जेकब बर्गमॅन – 'विल द रिव्हॉल्यूशन बाय लाइट स्प्रेड ऑल ओव्हर द वर्ल्ड' या पोस्ट संदर्भात

जेव्हा लोक एकत्र येतात व कल्पनांची देवाणघेवाण करतात, ते मला खूप आवडते. उत्कृष्ट ब्लॉग, आपले उत्तम कार्य चालू ठेवा.

– एक ब्लॉग वाचक – 'इंपॉर्टन्स ऑफ स्टिलनेस' या पोस्ट संदर्भात

सहज सांगावेसे वाटते की तुमचा लेख विस्मयकारक आहे. तुमच्या लेखातील स्पष्टता घवघवीत आहे व मला वाटते की आपण या विषयाचे तज्ज्ञ आहात. कोटी कोटी धन्यवाद. हे आनंददायक कार्य आपण असेच चालू ठेवावे.

– एक ब्लॉग वाचक – 'एक्लिप्स अँन्ड मेडिटेशन ट्रिपल एक्लिप्सेस इन एप्रिल अँन्ड मे २०१३' या पोस्ट संदर्भात

मला या गोष्टीचा खेद वाटतो की तुमच्या ब्लॉगवर 'डोनेट' हे बटन नाही! मी या अत्युत्तम ब्लॉगला देणगी दिली असती यात शंकाच नाही! मी नवीन लेखांची उत्सुकतेने वाट पाहीन.

– हेलेना – 'एक्सपीरियन्सिंग लाइट' या पोस्ट संदर्भात

माझ्यापुरते सांगायचे झाले तर, ज्या लोकांना प्रकाशाचा अनुभव येत नाही, त्यांची प्रकाशाच्या जगाशी संपर्क साधण्यासाठी आवश्यक असणारे प्रयत्न करण्याची पण तयारी नसते. पुष्कळ लोकांची नेटवर आणि जगभर फसवणूक होत आहे कारण आंतर–आयामांमध्ये कार्य करणाऱ्यांपैकी सर्वच जण सच्चे नसतात. ते पैसा, प्रसिद्धी, प्रेम, काम इत्यादी गोष्टींसाठी विकले जातात. ह्या मार्गावरील प्रवास अवघड आहे. त्याकरिता अभ्यास, ज्ञान व सत्त्वाची गरज असते. जेव्हा कठीण परिश्रम व खडतर अनुभवांनंतर तुम्ही एका विशिष्ट जागी पोहोचता तेव्हा, काही झाले तरी सत्याच्या मार्गावर चालण्याची तुमची खरोखरंच तयारी आहे का, हे बघण्यासाठी तुमची पुनःपुन्हा परीक्षा घेतली जाते. जर तसे नसेल तर तुम्ही स्वतःची फसवणूक करता आहात.

– विलियम डासी – 'एक्सपीरियन्सिंग लाइट' या पोस्ट संदर्भात

हे किती सत्य आहे! आपल्याला मिळणारे शहाणपण आपल्याला दुःख विसरायला लावते.

– गीता सरस्वती – 'युनिव्हर्सल विज्डम्' या पोस्ट संदर्भात

ह्या विषयाबद्दल माहिती प्राप्त करू इच्छिणाऱ्यांसाठी ही अगदी योग्य वेबसाईट आहे. आपल्याला इतका अनुभव आहे की आपल्यासोबत या विषयावर युक्तीवाद करणे खूप कठीण आहे. जो विषय दशकानुदशके चर्चिला गेला आहे त्यास आपण अगदी वेगळे व नवीन वळण दिले आहे. अत्युत्तम मजकूर, उत्कृष्ट !

– एक ब्लॉग वाचक – 'एनलायटमेंट' या पोस्ट संदर्भात

जे लोक माझ्या क्लीनिकवर येतात, त्यांचा मी एक हीलर या नात्याने उपचार करतो व त्यांना प्रकाश प्रवहनाबद्दल सुद्धा सांगतो आणि त्यांना प्रकाश प्रवहन करण्यास शिकवतो. तसेच त्यांना दररोज प्रकाश प्रवहन करण्याची विनंती करतो. हे परमेश्वराशी संपर्क जोडण्याचे सर्वात सोपे व प्रभावी तंत्र आहे.

– गणपती – 'अ मेसेज फ्रॉम द लाइट मास्टर्स' या पोस्ट संदर्भात

मागील बऱ्याच आठवड्यांपासून मी दररोज दोनवेळा प्रकाश–ध्यान करीत आहे. माझ्या दृष्टिकोनात, माझ्या वृत्तीत, माझ्या सहनशीलतेच्या पातळीत व सद्य परिस्थिती स्वीकारण्याच्या माझ्या क्षमतेत झालेले बदल मला जाणवत आहेत. हे बदल इतरांच्या देखील लक्षात आले आहेत हे मी जाणले आहे. बऱ्याच दिवसांपासून अनुभवली नव्हती अशी मनःशांती मी अनुभवत आहे. तरीही आणखीही खूप काही करायचे आहे, असे मला वाटते. आपल्या मार्गदर्शनाबद्दल, ज्ञानाबद्दल व दिलेल्या प्रेमाबद्दल धन्यवाद. मला धन्य झाल्यासारखे वाटते.

– मरिअन कोनर्स – 'अ मेसेज फ्रॉम द लाइट मास्टर्स' या पोस्ट संदर्भात

हा लेख वाचून माझे हृदय आनंदाने व प्रेमाने भरून गेले. धन्यवाद.

– एक ब्लॉग वाचक – 'अ मेसेज फ्रॉम द लाइट मास्टर्स' या पोस्ट संदर्भात

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 300/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore - 86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande